स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण
पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३
दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail - pilcbnskr@gmail.com

---

**प्रेसनोट** दिनांक :- २१/११/२०१८

## त्रंबकेश्वर शहरात भाविकांची लुटमार करणारे ०३ गुन्हेगार जेरबंद
### स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाची कारवाई

---

मा.सुप्रीम कोर्ट, दिल्ली येथील **ॲडव्होकेट श्री. सत्यम हरबन्सलाल अरोरा**, रा. रामप्रस्थ, जिल्हा गाझियाबाद, राज्य उत्तरप्रदेश हे गेल्या महिन्यात श्रीक्षेत्र त्रंबकेश्वर येथील गुरूव्दारामध्ये सेवेसाठी आले होते. दरम्यान दिनांक २४ ऑक्टोबर २०१८ रोजी रात्री ०९.३० वा. चे सुमारास श्री.सत्यम अरोरा हे त्रंबकेश्वर रिंगरोडने स्वामी समर्थ कमान ते गुरूव्दारा परिसरात पायी फिरत असतांना मोटर सायकलवर तोंडाला रूमाल बांधुन आलेले ०३ अज्ञात इसमांनी त्यांना मारहाण करून त्यांचेकडील सॅमसंग कंपनीचा एस-७ एज मोबाईल जबरीने हिसकावुन नेला होता. सदर घटनेबाबत **त्रंबकेश्वर पोलीस ठाणेस गुन्हा रजि.नं. ११०/२०१८** भादवि कलम ३९२,३४ प्रमाणे जबरी लुटमारीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सदर घटनेबाबत नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** व अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड सो.** यांनी तात्काळ दखल घेवुन गुन्हा उघडकीस आणणेसाठी मार्गदर्शन करून सुचना दिल्या. त्याप्रमाणे **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री.अशोक करपे** यांनी स्थागुशाचे पथकास घटनास्थळी पाचारण करून घडले प्रकाराबाबत सविस्तर माहिती घेतली, तसेच सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीतांचा कसोशिने शोध घेणेसाठी स्थागुशाचे तपास पथकास सुचना दिल्या. सदर गुन्हयाचे कार्यप्रणालीवरून गुन्हा करणारे आरोपी हे त्रंबकेश्वर व आजुबाजूचे परिसरातीलच असल्याचा तर्क लावुन स्थागुशाचे पथकाने तपास सुरू केला. दरम्यान सदर गुन्हयाचे समांतर तपासात असतांना, खब-यामार्फत मिळालेल्या गुप्त बातमीचे आधारे स्थागुशाचे पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी त्रंबकेश्वर मंदिर परिसरात सापळा रचुन **संशयीत नामे १) राहुल निवृत्ती तुपलोंढे**, वय २२, रा.त्रंबक पिंप्री, ता.त्रंबकेश्वर यास शिताफिने ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेले संशयीतास पोलीस खाक्या दाखविताच त्याने त्याचे **साथीदार नामे २) गणेश हिरामण पारधी**,वय २३, रा. त्रंबक पिंप्री, ता.त्रंबकेश्वर, **३) अक्षय संजय धोंगडे,** वय २४, रा. पेगलवाडी, ता.त्रंबकेश्वर यांचेसह सदर गुन्हा केल्याची कबुली दिली आहे. यातील आरोपी गणेश पारधी व अक्षय धोंगडे यांना पेगलवाडी परिसरातुन ताब्यात घेण्यात आले आहे.

सदर आरोपीतांचे कब्जातुन वरील गुन्हयात जबरीने लुटमार करून नेलेला २५ हजार रू. किंमतीचा **सॅमसंग एस-७ एज मोबाईल** फोन व गुन्हयात वापरलेली **हिरो स्प्लेंडर मोटर सायकल** असा **एकुण ५५ हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल हस्तगत** करण्यात आलेला आहे. वरील गुन्हयाचे समांतर तपासात सदर आरोपीतांकडुन अजुन काही गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता असुन जप्त मुद्देमाल व आरोपीतांना त्रंबकेश्वर पोलीस ठाणेस हजर करण्यात आलेले आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** व अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड सो.** यांनी केलेले मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे,** पोलीस उपनिरीक्षक **श्री. मच्छिंद्र रणमाळे**, सपोउनि नवनाथ गुरूळे, चंद्रभान जाधव, पोहवा राजु दिवटे, पोना जालिंदर खराटे, पोकॉ संदिप हांडगे, लहु भावनाथ, हेमंत गिलबिले, कपालेश्वर ढिकले, सचिन पिंगळ, प्रदिप बहिरम, संदिप लगड यांचे पथकाने सदर जबरीचोरीचे गुन्हयातील ०३ आरोपीतांना ताब्यात घेवुन गुन्हा उघडकीस आणलेला आहे.